.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 5 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ५ ॥

॥ दशक पांचवा : मंत्रांचा ॥ ५ ॥

समास पहिला : गुरुनिश्चय

॥ श्रीराम ॥

जय जय जी सद्गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा ।
अनुर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला न वचे ॥ १ ॥
जें वेदांस सांकडें । जें शब्दासि कानडें ।
तें सत्शिष्यास रोकडें । अलभ्य लाभे ॥ २ ॥
जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम ।
जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥
तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होईजे आंगें ।
दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ॥ ४ ॥
आतां स्वामिचेनि लडिवाळपणें । गुरुशिष्यांचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें प्रमाणें - । मुमुक्षें शरण जावें ॥ ५ ॥
गुरु तों सकळांसी ब्राह्मण । जर्‍हीं तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासीच शरण । अनन्यभावें असावें ॥ ६ ॥
अहो या ब्राह्मणाकारणें । अवतार घेतला नारायेणें ।
विष्णूनें श्रीवत्स मिरविणें । तेथें इतर ते किती ॥ ७ ॥
ब्राह्मणवचनें प्रमाण । होती शूद्रांचे ब्राह्मण ।
धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणचेनि मंत्रें ॥ ८ ॥
मुंजीबंधनेंविरहित । तो शूद्रचि निभ्रांत ।
द्विजन्मी म्हणोनि सतंत । द्विज ऐसें नाम त्याचें ॥ ९ ॥
सकळांसि पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण ।
वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिये भगवंता ॥ १० ॥
ब्राह्मणीं योग याग व्रतें दानें । ब्राह्मणीं सकळ
तीर्थाटणें ।
कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ॥ ११ ॥
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत ।
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्येंकरूनी ॥ १२ ॥
ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती- । होऊन, जडे भगवंतीं ।
ब्राह्मणतीर्थे उत्तम गती । पावती प्राणी ॥ १३ ॥
लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । आन यातिसि पुसे कोण ।
परी भगवंतासि भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ॥ १४ ॥
असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती ।
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥ १५ ॥
अंत्येज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काये करावा ।
ब्राह्मणासन्निध पुजावा । हें तों न घडे कीं ॥ १६ ॥
जें जनावेगळें केलें । तें वेदें अव्हेरिलें ।
म्हणोनि तयासि नाम ठेविलें । पाषांडमत ॥ १७ ॥
असो जे हरिहरदास । तयास ब्राह्मणीं विस्वास ।
ब्राह्मणभजनें बहुतांस । पावन केलें ॥ १८ ॥
ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा ।
ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्गुरुविण नाहीं ॥ १९ ॥
स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण ।
ब्रह्मज्ञान नस्तां सीण । जन्ममृत्य चुकेना ॥ २० ॥
सद्गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ॥ २१ ॥
ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें ।
म्हणौनि सद्गुरूचीं पाऊलें । सुदृढ धरावीं ॥ २२ ॥
जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥
नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं ।
गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ॥ २४ ॥
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
गोरांजनें धूम्रपानें । साधिती पंचाग्नी ॥ २५ ॥
हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण ।
सर्व तीर्थें परम कठिण । फिरती प्राणी ॥ २६ ॥
झळफळित देवतार्चनें । स्नानें संध्या दर्भासनें ।
टिळे माळा गोपीचंदनें । ठसे श्रीमुद्रांचे ॥ २७ ॥
अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्रयंत्रांचीं
तांब्रपर्णें ।
नाना प्रकारीचीं उपकर्णें । साहित्यशोभा ॥ २८ ॥
घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणी स्तुती ।
आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षणा नमस्कार ॥ २९ ॥
पंचायेत्न पूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली ।
बेलें नारिकेळें भरिली । संपूर्ण सांग पूजा ॥ ३० ॥
उपोषणें निष्ठा नेम । परम सायासीं केलें कर्म ।
फळचि पावती, वर्म- । चुकले प्राणी ॥ ३१ ॥
येज्ञादिकें कर्में केलीं । हृदईं फळाशा कल्पिली ।
आपले इछेनें घेतली । सूति जन्मांची ॥ ३२ ॥
करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ।
रिद्धि सिद्धि सावकास । वोळल्या जरी ॥ ३३ ॥
तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।
येमेपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥
जंव नाहीं ज्ञानप्राप्ती । तंव चुकेना यातायाती ।
गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ॥ ३५ ॥

ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्ती भाव आणी भजन ।
सकळहि फोल ब्रह्मज्ञान - । जंव तें प्राप्त नाहीं ॥ ३६ ॥
सद्गुरुकृपा न जोडे । आणी भलतीचकडे वावडे ।
जैसें आंधळें चाचरोन पडे । गारीं आणी गडधरां ॥ ३७ ॥
जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
तैसें सद्गुरुवचनें ज्ञान- । प्रकाश होये ॥ ३८ ॥
सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥
सद्गुरुचेनि अभयंकरें । प्रगट होईजे ईश्वरें ।
संसारदुःखें अपारें । नासोन जाती ॥ ४० ॥
मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ।
तयांसहि ज्ञानविज्ञानविचार । सद्गुरुचेनी ॥ ४१ ॥
श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अतितत्पर गुरुभजनीं ।
सिद्ध साधु आणी संतजनीं । गुरुदास्य केलें ॥ ४२ ॥
सकळ सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक ।
तेहि सद्गुपदीं रंक । महत्वा न चढेती ॥ ४३ ॥
असो जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा ।
सद्गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ ४४ ॥
आतां सद्गुरु ते कैसे । नव्हेति इतरां गुरु ऐसे ।
जयांचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ४५ ॥
त्या सद्गुरूची वोळखण । पुढिले समासीं निरूपण ।
बोलिलें असे श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ॥ ४६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुनिश्चयेनाम
समास पहिला ॥ १ ॥ ५.१

समास दुसरा : गुरुलक्षण

॥ श्रीराम ॥

जे करामती दाखविती । तेहि गुरु म्हणिजेती ।
परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥ १ ॥
सभामोहन भुररीं चेटकें । साबरमंत्र कौटालें अनेकें ।
नाना चमत्कार कौतुकें । असंभाव्य सांगती ॥ २ ॥
सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग ।
दृष्टिबंधनें लागवेग । अभिळाषाचा ॥ ३ ॥
साहित संगीत रागज्ञान । गीत नृत्य तान मान ।
नाना वाद्यें सिकविती जन । तेहि येक गुरु ॥ ४ ॥
विद्या सिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी ।
कां पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती ॥ ५ ॥
जो यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर ।
तेहि गुरु परी साचार- । सद्गुरु नव्हेती ॥ ६ ॥
आपली माता आणी पिता । तेहि गुरुचि तत्वतां ।
परी पैलापार पावविता । तो सद्गुरु वेगळा ॥ ७ ॥
गाईत्रीमंत्राचा उचारू । सांगे तो साचार कुळगुरु ।
परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं ॥ ८ ॥
जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारें निरसी ।
जीवात्मयां परमात्मयांसी । ऐक्यता करी ॥ ९ ॥
विघडले देव आणी भक्त । जीवशिवपणें द्वैत ।
तया देवभक्तां येकांत- । करी, तो सद्गुरु ॥ १० ॥
भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास तडातोडी ।
केली, देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥ ११ ॥
प्राणी मायाजाळीं पडिलें । संसारदुःखें दुःखवलें ।
ऐसें जेणें मुक्त केलें । तो सद्गुरु जाणावा ॥ १२ ॥
वासनानदीमाहांपुरीं । प्राणी बुडतां ग्लांती करी ।
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥
गर्भवास अति सांकडी । इछाबंधनाची बेडी ।
ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्गुरु स्वामी ॥ १४ ॥
फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार ।
तोचि गुरु माहेर । अनाथांचें ॥ १५ ॥
जीव येकदेसी बापुडें । तयास ब्रह्मचि करी रोकडें ।
फेडी संसारसांकडे । वचनमात्रें ॥ १६ ॥
जें वेदांचे अभ्यांतरीं । तें काढून अपत्यापरी ।
शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें ॥ १७ ॥
वेद शास्त्र माहानुभाव । पाहातां येकचि अनुभव ।
तोचि येक गुरुराव । ऐक्यरूपें ॥ १८ ॥
संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी ।
वेदविरहित टवाळी । करूंच नेणे ॥ १९ ॥
जें जें मन अंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी ।
तो गुरु नव्हे, भिकारी- । झडे आला ॥ २० ॥
शिष्यास न लविती साधन । न करविती इंद्रियेंदमन ।
ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ २१ ॥
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।
इंद्रियेंदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥
येक द्रव्याचे विकिले । येक शिष्याचे आखिले ।
अतिदुराशेनें केले । दीनरूप ॥ २३ ॥
जें जें रुचे शिष्यामनीं । तैसीच करी मनधरणी ।
ऐसी कामना पापिणी । पडली गळां ॥ २४ ॥
जो गुरु भीडसारु । तो अद्धमाहून अद्धम थोरु ।
चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ॥ २५ ॥
जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी ।
आणी सेखीं भीड करी । घातघेणा ॥ २६ ॥
तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा ।
भीड करूनियां, गोवा- । घाली बंधनाचा ॥ २७ ॥
जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन ।
तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ॥ २८ ॥
देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकिती कर्णद्वारें ।
इतुकेंच ज्ञान, तें पामरें- । अंतरलीं भगवंता ॥ २९ ॥
बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण ।
तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षें ॥ ३० ॥

अद्वैतनिरूपणीं अगाध वक्ता । परी विषई लोलंगता ।
ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ ३१॥
जैसा निरूपणसमयो । तैसेंचि मनहि करी वायो ।
कृतबुद्धीचा जयो । जालाच नाहीं ॥ ३२॥
निरूपणीं सामर्थ्य सिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी ।
नाना चमत्कारें बुद्धी । दंडळूं लागे ॥ ३३॥
पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत ।
आणी सामर्थ्यहि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥ ३४॥
ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञानचि नुसदें वेर्थ ।
ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ॥ ३५॥
निशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ।
दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥ ३६॥
बहुत ज्ञातीं नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं ।
कामना इच्छितांच मेलीं । बापुडीं मूर्खें ॥ ३७॥
निशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत ।
अवघ्यांवेगळें मत । अक्षै ज्याचें ॥ ३८॥
अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा ।
तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ॥ ३९॥
सिद्धि आणी सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें ।
तेणें बेंचाड बळकावलें । देहबुद्धीचें ॥ ४०॥
सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख ।
कामनेसारिखें दुःख । आणीक कांहींच नाहीं ॥ ४१॥
ईश्वरेंविण जे कामना । तेणेंचि गुणें नाना यातना ।
पावती, होती पतना- । वरपडे प्राणी ॥ ४२॥
होतां शरीरासी अंत । सामर्थ्यहि निघोन जात ।
सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥ ४३॥
म्हणोनि निःकामताविचारु । दृढबुद्धीचा निर्धारु ।
तोचि सद्गुरु पैलपारु । पाववी भवाचा ॥ ४४॥
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ॥ ४५॥
याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ॥ ४६॥
याहिवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा निरूपण ।
जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७॥
जेथें सारासारविचार । तेथें होये जगोद्धार ।
नवविधा भक्तीचा आधार । बहुता जनासी ॥ ४८॥
म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठलें साधन ।
हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ॥ ४९॥
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।
तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती ॥ ५०॥
नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेंविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ५१॥
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ॥ ५२॥
यामधें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणौन सर्वहि विलसे । सद्गुरुपासीं ॥ ५३॥
तो बहुतांचें पाळणकर्ता । त्यास बहुतांची असे चिंता ।
नाना साधनें समर्था । सद्गुरुपासीं ॥ ५४॥
साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुतां सवेंच भ्रष्टे ।
याकारणे दुरीद्रष्टे । माहानुभाव ॥ ५५॥
आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महंती । कोण पुसे ॥ ५६॥
कर्म उपासनेचा अभाव । तेथें भकाधेसि जाला ठाव ।
तो कानकोंडा समुदाव । प्रपंची हांसती ॥ ५७॥
नीच यातीचा गुरु । तोही कानकोंडा विचारु ।
ब्रह्मसभेस जैसा चोरू । तैसा दडे ॥ ५८॥
ब्रह्मसभे देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां ।
अथवा प्रसाद सेवितां । प्राश्चित पडे ॥ ५९॥
तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली ।
गुरुभक्ति ते सटवली । येकायेकी ॥ ६०॥
गुरुची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्वतां ।
तेथें ब्राह्मण्य रक्षूं जातां । गुरुक्षोभ घडे ॥ ६१॥
ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें प्रस्तावा घडे ।
नीच यातीस गुरुत्व न घडे । याकारणें ॥ ६२॥
तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें ।
बहुत जनांसी भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ॥ ६३॥
आतां असो हा विचारू । स्वयातीचा पाहिजे गुरु ।
नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ॥ ६४॥
जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूचें लक्षण ।
तथापि सांगों वोळखण । होये जेणें ॥ ६५॥
येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तांत्रगुरु ।
येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ॥ ६६॥
येक कुळगुरु येक मानिला गुरु । येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु ।
येक असद्गुरु येक यातिगुरु । दंडकर्ते ॥ ६७॥
येक मातागुरु येक पितागुरु । येक राजागुरु येक देवगुरु ।
येक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा ॥ ६८॥
ऐसे हे सत्रा गुरु । याहिवेगळे आणीक गुरु ।
ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ॥ ६९॥
येक स्वप्नगुरु येक दीक्षागुरु । येक म्हणती प्रतिमागुरु ।
येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ॥ ७०॥
जे जे यातीचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितुके गुरु ।
याचा पाहातां विचारु । उदंड आहे ॥ ७१॥
असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारु ।
परी जो मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळाचि असे ॥ ७२॥
नाना सद्विद्येचे गुण । याहिवरी कृपाळूपण ।
हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ ७३॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुलक्षणनाम
समास दुसरा ॥ २ ॥ ५.२

समास तिसरा : शिष्यलक्षण
॥ श्रीराम ॥
मागां सद्‌गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण ।
आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ॥ १ ॥
सद्‌गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष ।
कां सच्छिष्येंविण विशेष । सद्‌गुरु सिणे ॥ २ ॥
उत्तमभूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद ।
कां तें उत्तम बीज परी समंध । खडकेंसि पडिला ॥ ३ ॥
तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । परंतु गुरु सांगे मंत्र तंत्र ।
तेथें अरत्र ना परत्र । कांहिंच नाहीं ॥ ४ ॥
अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ५ ॥
तैसें येकाविण येक । होत असे निरार्थक ।
परलोकींचें सार्थक । तें दुऱ्हावे ॥ ६ ॥
म्हणौनि सद्‌गुरु आणी सच्छिष्य । तेथें न लगती सायास ।
त्यां उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा ॥ ७ ॥
सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना प्रजन्येंविण ।
तैसें अध्यात्मनिरूपण । नस्तां होये ॥ ८ ॥
सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें ।
साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ॥ ९ ॥
जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघेंचि करणें लागे ।
पीक आलियांहि, उगें- । राहोंचि नये ॥ १० ॥
तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदंड जेविलें । तऱ्हीं सामग्री पाहिजे ॥ ११ ॥
म्हणौन साधन अभ्यास आणी सद्‌गुगु । सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारु ।
सत्कर्म सद्वासना, पारु- । पाववी भवाचा ॥ १२ ॥
सदुपासना सत्कर्म । सत्क्रिया आणी स्वधर्म ।
सत्संग आणी नित्य नेम । निरंतर ॥ १३ ॥
ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे ।
नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदाई ॥ १४ ॥
येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्‌गुरुपासीं ।
सद्‌गुरु पालटी अवगुणासी । नाना येत्नें करूनी ॥ १५ ॥
सद्‌गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्‌गुरु न पालटे ।
कां जें थोरपण तुटे । म्हणौनिया ॥ १६ ॥
याकरणें सद्‌गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे ।
नाहिं तरी होईजे । पाषांडा वरपडे ॥ १७ ॥
येथें सद्‌गुरुचि कारण । येर सर्व निःकारण ।
तथापि सांगो वोळखण । सच्छिष्याची ॥ १८ ॥
मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ १९ ॥
शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २० ॥
शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे सुचिष्मंत ।
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्वप्रकारीं ॥ २१ ॥
शिष्य पाहिजे साक्षपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥ २२ ॥
शिष्य पाहिजे अति धीर । शिष्य पाहिजे अति उदार ।
शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थविषईं ॥ २३ ॥
शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी ।
शिष्य पाहिजे अर्थातरीं । प्रवेशकर्ता ॥ २४ ॥
शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध ।
शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणांचा ॥ २५ ॥
शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त ।
शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ॥ २६ ॥
शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत ।
शिष्य पाहिजे संतासंत । विचार घेता ॥ २७ ॥
शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढ व्रताचा ।
शिष्य पाहिजे उत्तम कुळीचा । पुण्यसीळ ॥ २८ ॥
शिष्य असावा सात्विक । शिष्य असावा भजक ।
शिष्य असावा साधक । साधनकर्ता ॥ २९ ॥
शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी ।
शिष्य असावा परमार्थासी । वाढऊं जाणे ॥ ३० ॥
शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र ।
शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणें ॥ ३१ ॥
शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा ।
शिष्य असावा अंतरींचा । परमशुद्ध ॥ ३२ ॥
शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी ।
शिष्य असावा संसारदुःखी । संतप्त देही ॥ ३३ ॥
जो संसारदुःखें दुःखवला । जो त्रिविधतापें पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थविषीं ॥ ३४ ॥
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे ।
संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ३५ ॥
जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विस्वास ।
विस्वासबळें दृढ कास । धरिली सद्‌गुरूची ॥ ३६ ॥
अविस्वासें कास सोडिली । ऐसीं बहुतेक भवीं बुडालीं ।
नाना जळचरीं तोडिलीं । मध्येंचि सुखदुःखें ॥ ३७ ॥
याकारणें दृढ विस्वास । तोचि जाणावा सच्छिष्य ।
मोक्षाधिकारी विशेष । आग्रगण्यु ॥ ३८ ॥
जो सद्‌गुरुवचनें निवाला । तो सायोज्यतेचा आंखिला ।
संसारसंगे पांगिला । न वचे कदा ॥ ३९ ॥
सद्‌गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।
सुटला वैभवाचा फांटा । सामरथ्यपिसें ॥ ४० ॥

सद्गुरुस्वरूप तें संत । आणी देवांस मांडेल कल्पांत ।
तेथें कैचें उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ॥ ४१ ॥
म्हणौन सद्गुरुसामर्थ्य आधीक । जेथें आटती ब्रह्मादिक ।
अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ॥ ४२ ॥
गुरुदेवांस बराबरी- । करी तो शिष्य दुराचारी ।
भ्रांति बैसली अभ्यांतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥
देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासि आला ।
सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनि ॥ ४४ ॥
म्हणौनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें ।
जयासि वर्णितां भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ॥ ४५ ॥
असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥
अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासीं ।
ज्ञानबळें वैभवासी । तृणतुछ केलें ॥ ४७ ॥
अहो सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें ।
मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न यें ॥ ४८ ॥
ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव ।
तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ ४९ ॥
अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें ।
पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥
लागतां सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें ।
तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ॥ ५१ ॥
शरण सद्गुरूस गेले । सच्छिष्य ऐसे निवडले ।
क्रियापालटें जाले । पावन ईश्वरीं ॥ ५२ ॥
ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वाटेकरी ।
येर माईक वेषधारी । असच्छिष्य ॥ ५३ ॥
वाटे विषयांचे सुख । परमार्थ संपादणे लौकिक ।
देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेले ॥ ५४ ॥
जाली विषई वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार ।
परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ॥ ५५ ॥
मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा ।
भार वाहिला कुटुंबाचा । काबाडी जाला ॥ ५६ ॥
मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थी विनोद ।
भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ॥ ५७ ॥
सूकर पूजिलें विलेपनें । म्हैसा मर्दिला चंदनें ।
तैसा विषई ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ॥ ५८ ॥
रासभ उकिरडां लोळे । तयासि परिमळसोहळे ।
उलूक अंधारीं पळे । तया केवी हंसपंगती ॥ ५९ ॥
तैसा विषयदारींचा बराडी । घाली अधःपतनीं उडी ।
तयास भगवंत आवडी । सत्संग कैंचा ॥ ६० ॥
वर्ती करून दांताळीं । स्वानपुत्र हाडें चगळी ।
तैसा विषई तळमळी । विषयसुखाकारणे ॥ ६१ ॥
तया स्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन ।
तैसें विषयशक्तां ज्ञान । जिरेल कैंचें ॥ ६२ ॥
रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्यें प्रतिष्ठला ।
न वचे, तैसा आशक्ताला । परमार्थ नाहीं ॥ ६३ ॥
मिळाला राजहंसांचा मेळा । तेथें आला डोंबकावळा ।
लक्षून विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ॥ ६४ ॥
तैसे सज्जनाचे संगती । विषई सज्जन म्हणविती ।
विषय आमेद्य चित्तीं । गोळा लक्षिला ॥ ६५ ॥
काखे घेऊनियां दारा । म्हणे मज संन्यासी करा ।
तैसा विषई सैरावैरा । ज्ञान बडबडी ॥ ६६ ॥
असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख ।
नारकी प्राणी नर्क । भोगिती स्वइच्छा ॥ ६७ ॥
वैषेची करील सेवा । तो कैसा मंत्री म्हणावा ।
तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवी ॥ ६८ ॥
तैसे विषई बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे ।
वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाले ॥ ६९ ॥
ऐसे शिष्य परम नष्ट । कनिष्ठांमधें कनिष्ठ ।
हीन अविवेकी आणी दुष्ट । खळ खोटे दुर्जन ॥ ७० ॥
ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप ।
तयांस प्राश्चीत, अनुताप- । उद्भवतां आहे ॥ ७१ ॥
तेंहि पुन्हां शरण जावें । सद्गुरूस संतोषवावें ।
कृपादृष्टी जालियां व्हावें । पुन्हां शुद्ध ॥ ७२ ॥
स्वामीद्रोह जया घडे । तो यावश्चंद्र नरकीं पडे ।
तयास उपावचि न घडे । स्वामी तुष्टल्यावांचुनी ॥ ७३ ॥
स्मशानवैराग्य आलें । म्हणोन लोटांगण घातलें ।
तेणें गुणें उपतिष्ठले- । नाहीं ज्ञान ॥ ७४ ॥
भाव आणिला जायाचा । मंत्र घेतला गुरूचा ।
शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ॥ ७५ ॥
ऐसे केले गुरु उदंड । शब्द सिकला पाषांड ।
जाला तोंडाळ तमुंड । माहापाषांडी ॥ ७६ ॥
घडी येक रडे आणी पडे । घडी येक वैराग्य चढे ।
घडी येक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ॥ ७७ ॥
घडी येक विस्वास धरी । सवेंच घडि येक गुर्गुरी ।
ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ॥ ७८ ॥
काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार ।
अभिमान कापट्य तिरस्कार । हृदई नांदती ॥ ७९ ॥
अहंकार आणी देहपांग । अनाचार आणी विषयसंग ।
संसार प्रपंच उद्वेग । अंतरीं वसे ॥ ८० ॥
दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की विकल्पी ।
अभक्त अभाव सीघ्रकोपी । निष्ठुर परघातक ॥ ८१ ॥
हृदयेंसुन्य आणी आळसी । अविवेकी आणि अविस्वासी ।
अधीर अविचार, संदेहासी- । दृढ धर्ता ॥ ८२ ॥
आशा ममता तृष्णा कल्पना । कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना ।
अल्पबुद्धि विषयकामना । हृदई वसे ॥ ८३ ॥

ईषणा असूया तिरस्कारें । निंदेसि प्रवर्ते आदरें ।
देहाभिमानें हुंबरे । जाणपणें ॥ ८४ ॥
क्षुधा तृष्णा आवरेना । निद्रा सहसा धरेना ।
कुटुंबचिंता वोसरेना । भ्रांति पडिली ॥ ८५ ॥
शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा ।
अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ॥ ८६ ॥
भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दांती ।
कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेच ना ॥ ८७ ॥
कायाक्लेसीं शेरीरहीन । धर्मविषई परम कृपण ।
क्रिया पालटेना कठिण । हृदये जयाचें ॥ ८८ ॥
आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिये सज्जनासी ।
जयाचे जिवीं आहिर्णेसीं । परन्यून वसे ॥ ८९ ॥
सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका ।
क्रिया विचार पाहातां, येका । वचनीं सत्य नाहीं ॥ ९० ॥
परपीडेविषई तत्पर । जैसे विंचु आणि विखार ।
तैसा कुशब्दें जिव्हार । भेदी सकळांचें ॥ ९१ ॥
आपले झांकी अवगुण । पुढिलांस बोले कठिण ।
मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ॥ ९२ ॥
स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांचि कणव न करी ।
जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥ ९३ ॥
दुःख पराव्याचें नेणती । दुर्जन गांजिले चि गांजिती ।
श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ॥ ९४ ॥
स्वदुःखें झुरे अंतरीं । आणी परदुःखें हास्य करी ।
तयास प्राप्त येमपुरी । राजदूत ताडिती ॥ ९५ ॥
असो ऐसें मदांध बापुडें । तयांसि भगवंत कैंचा जोडे ।
जयांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ॥ ९६ ॥
तयास देहाचा अंतीं । गात्रें क्षीणता पावती ।
जिवलगें वोसंडिती । जाणवेल तेव्हां ॥ ९७ ॥
असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे ।
दृढभावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥ ९८ ॥
जये स्थळीं विकल्प जागे । कुळाभिमान पाठीं लागे ।
ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ॥ ९९ ॥
जेणेंकरितां दुःख जालें । तेंचि मनीं दृढ धरिलें ।
तेणें गुणें प्राप्त जालें । पुन्हां दुःख ॥ १०० ॥
संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ।
ऐसें जाणोन अनहित केलें । ते दुःखी होती स्वयें ॥ १०१ ॥
संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती ।
जाणोन डोळे झांकिती । पढतमूर्ख ॥ १०२ ॥
प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।
परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ १०३ ॥
मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण ।
आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ॥ १०४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शिष्यलक्षणनाम
समास तिसरा ॥ ३ ॥ ५.३

समास चवथा : उपदेशलक्षण
॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविधें कोण कोणें ।
सांगतां तें असाधारणें । परी कांहीं येक सांगों ॥ १ ॥
बहुत मंत्र उपदेशिती । कोणी नाम मात्र सांगती ।
येक ते जप करविती । वोंकाराचा ॥ २ ॥
शिवमंत्र भवानीमंत्र । विष्णुमंत्र माहालक्ष्मीमंत्र ।
अवधूतमंत्र गणेशमंत्र । मार्तंडमंत्र सांगती ॥ ३ ॥
मछकूर्मवऱ्हावमंत्र । नृसिंहमंत्र वामनमंत्र ।
भार्गवमंत्र रघुनाथमंत्र । कृष्णमंत्र सांगती ॥ ४ ॥
भैरवमंत्र मल्लारिमंत्र । हनुमंतमंत्र येक्षिणीमंत्र ।
नारायेणमंत्र पांडुरंगमंत्र । अघोरमंत्र सांगती ॥ ५ ॥
शेषमंत्र गरुडमंत्र । वायोमन्त्र वेताळमंत्र ।
झोटिंगमंत्र बहुधा मंत्र । किती म्हणौनि सांगावे ॥ ६ ॥
बाळामंत्र बगुळामंत्र । काळिमंत्र कंकाळिमंत्र ।
बटुकमंत्र नाना मंत्र । नाना शक्तींचे ॥ ७ ॥
पृथकाकारें स्वतंत्र । जितुके देव तितुके मंत्र ।
सोपे अवघड विचित्र । खेचर दारुण बीजाचे ॥ ८ ॥
पाहों जातां पृथ्वीवरी । देवांची गणना कोण करी ।
तितुके मंत्र वैखरी । किती म्हणौनि वदवावी ॥ ९ ॥
असंख्यात मंत्रमाळा । येकाहूनि येक आगळा ।
विचित्र मायेची कळा । कोण जाणे ॥ १० ॥
कित्येक मंत्रीं भूतें जाती । कित्येक मंत्रीं वेथा नासती ।
कित्येक मंत्रीं उतरती । सितें विंचू विखार ॥ ११ ॥
ऐसे नाना परीचे मंत्री । उपदेशिती कर्णपात्रीं ।
जप ध्यान पूजा यंत्री । विधानयुक्त सांगती ॥ १२ ॥
येक शिव शिव सांगती । येक हरि हरि म्हणविती ।
येक उपदेशिती । विठल विठल म्हणोनी ॥ १३ ॥
येक सांगती कृष्ण कृष्ण । येक सांगती विष्ण विष्ण ।
येक नारायण नारायण । म्हणौन उपदेशिती ॥ १४ ॥
येक म्हणती अच्युत अच्युत । येक म्हणती अनंत अनंत ।
येक सांगती दत्त दत्त । म्हणत जावें ॥ १५ ॥
येक सांगती राम राम । येक सांगती ॐ ॐ म ।
येक म्हणती मेघशाम । बहुतां नामीं स्मरावा ॥ १६ ॥
येक सांगती गुरु गुरु । येक म्हणती परमेश्वरु ।
येक म्हणती विघ्नहरु । चिंतीत जावा ॥ १७ ॥
येक सांगती शामराज । येक सांगती गरुडध्वज ।
येक सांगती अधोक्षज । म्हणत जावें ॥ १८ ॥
येक सांगती देव देव । येक म्हणती केशव केशव ।
येक म्हणती भार्गव भार्गव । म्हणत जावें ॥ १९ ॥
येक विश्वनाथ म्हणविती । येक मल्लारि सांगती ।
येक ते जप करविती । तुकाई तुकाई म्हणौनी ॥ २० ॥

हें किती म्हणौनी सांगावें । शिवशक्तीचीं अनंत नांवें ।
इच्छेसारिखीं स्वभावें । उपदेशिती ॥ २१ ॥
येक सांगती मुद्रा च्यारी । खेचरी भूचरी चाचरी अगोचरी ।
येक आसनें परोपरी । उपदेशिती ॥ २२ ॥
येक दाखविती देखणी । येक अनुहातध्वनी ।
येक गुरु पिंडज्ञानी । पिंडज्ञान सांगती ॥ २३ ॥
येक संगती कर्ममार्ग । येक उपासनामार्ग ।
येक सांगती अष्टांग योग । नाना चक्रें ॥ २४ ॥
येक तपें सांगती । येक अजपा निरोपिती ।
येक तत्वें विस्तारिती । तत्वज्ञानी ॥ २५ ॥
येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण ।
येक उपदेशिती तीर्थाटण । फिरावें म्हणूनी ॥ २६ ॥
येक माहावाक्यें सांगती । त्यांचा जप करावा म्हणती ।
येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म म्हणोनी ॥ २७ ॥
येक शाक्तमार्ग सांगती । येक मुक्तमार्ग प्रतिष्ठिती ।
येक इंद्रियें पूजन करविती । येका भावें ॥ २८ ॥
येक सांगती वशीकर्ण । स्तंबन मोहन उच्चाटण ।
नाना चेटकें आपण । स्वयें निरोपिती ॥ २९ ॥
ऐसी उपदेशांची स्थिती । पुरे आतां सांगों किती ।
ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ॥ ३० ॥
ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेविण निरार्थक ।
येविषई असे येक । भगवद्वचन ॥ ३१ ॥
श्लोक ॥ नानाशास्त्रं पठेल्लोको नाना दैवतपूजनम् ।
आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ॥
शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मताः ।
अपभ्रंशसमास्तेऽपि जीवानां भ्रांतचेतसाम् ॥
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम् ॥
याकारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे अन्न ।
म्हणौन आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ॥ ३२ ॥
सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश ।
येविषई जगदीश । बहुतां ठाई बोलिला ॥ ३३ ॥
श्लोक ॥ यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानं देहे प्रतिष्ठितम् ।
तस्य दासस्य दासोहं भवे जन्मनि जन्मनि ॥
आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा ।
प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाणे ॥ ३४ ॥
सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती ।
त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ॥ ३५ ॥
श्लोकः ॥ पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् ।
तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमम् ॥
म्हणौनि जें आत्मज्ञान । तें गहनाहूनि गहन ।
ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ॥ ३६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपदेशनाम
समास चवथा ॥ ४ ॥ ५.४

समास पांचवा : बहुधाज्ञान निरूपण

॥ श्रीराम ॥

जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तंव सर्व कांहीं निर्फळ ।
ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ १ ॥
ज्ञान म्हणतां वाटे भरम । काये रे बा असेल वर्म ।
म्हणौनि हा अनुक्रम । सांगिजेल आतां ॥ २ ॥
भूत भविष्य वर्तमान । ठाऊकें आहे परिच्छिन्न ।
यासीहि म्हणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ ३ ॥
बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाधेन । हेंहि ज्ञान नव्हे ॥ ४ ॥
नाना वेवसायाचें ज्ञान । नाना दिक्षेचें ज्ञान ।
नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ॥ ५ ॥
नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा ।
नाना नरांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ६ ॥
नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा ।
नाना स्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ७ ॥
नाना पशूंची परीक्षा । नाना पक्षांची परीक्षा ।
नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ८ ॥
नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा ।
नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ९ ॥
नाना धातूंची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा ।
नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १० ॥
नाना पाषाण परीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा ।
नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ११ ॥
नाना भूमींची परीक्षा । नाना जळांची परीक्षा ।
नाना सतेज परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १२ ॥
नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा ।
नाना अंकुर परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १३ ॥
नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा ।
नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १४ ॥
नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा ।
नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १५ ॥
नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा ।
नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १६ ॥
नाना क्षत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा ।
नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १७ ॥
नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा ।
नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १८ ॥
नाना अनुमान परीक्षा । नाना नेमस्त परीक्षा ।
नाना प्रकार परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १९ ॥
नाना विद्येची परीक्षा । नाना कळेची परीक्षा ।
नाना चातुर्य परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २० ॥
नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा ।

नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २१॥
नाना स्वरांची परीक्षा । नाना वर्णांची परीक्षा ।
नाना लेक्षनपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २२॥
नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा ।
नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २३॥
नाना रूपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा ।
नाना सुगंधपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २४॥
नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तारपरीक्षा ।
नाना पदार्थपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २५॥
नेमकेचि बोलणें । तत्काळचि प्रतिवचन देणें ।
सीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ २६॥
नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा ।
स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २७॥
काव्यकुशळ संगीतकळा । गीत प्रबंद नृत्यकळा ।
सभाच्यातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २८॥
वाग्विळास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा ।
हास्य विनोद कामकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २९॥
नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा ।
नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३०॥
आदिकरूनि चौसष्टि कळा । याहि वेगळ्या नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३१॥
असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण ।
तरी ते कौशल्यता, परी ज्ञान- । म्हणोंचि नये ॥ ३२॥
हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें ।
जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वाव ॥ ३३॥
जाणावें दुसऱ्याचें जीवीचें । हे ज्ञान वाटे साचें ।
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ ३४॥
माहानुभाव माहाभला । मानसपूजा करितां चुकला ।
कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनी ॥ ३५॥
ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासि परम ज्ञाता म्हणती ।
परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ॥ ३६॥
बहुत प्रकारींची ज्ञानें । सांगों जातां असाधारणें ।
सायोज्यप्राप्ती होये जेणें । तें ज्ञान वेगळें ॥ ३७॥
तरी तें कैसें आहे ज्ञान । समाधानाचें लक्षण ।
ऐसें हें विशद करून । मज निरोपावें ॥ ३८॥
ऐसें शुद्ध ज्ञान पुसिलें । तें पुढिले समासीं निरोपिलें ।
श्रोतां अवधान दिधलें । पाहिजे पुढें ॥ ३९॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बहुधाज्ञाननाम
समास पांचवा ॥ ५॥ ५.५

समास सहावा : शुद्धज्ञान निरूपण
॥ श्रीराम ॥
ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥ १॥
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप वोळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ २॥
जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे ।
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ॥ ३॥
मनबुद्धि अगोचर । न चले तर्काचा विचार ।
उल्लेख परेहुनि पर । या नांव ज्ञान ॥ ४॥
जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५॥
सर्वसाक्षी अवस्ता तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया ।
परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान ॥ ६॥
दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ॥ ७॥
जेथें सर्वचि नाहीं ठाईचें । तेथें सर्वसाक्षत्व
कैंचें ।
म्हणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ॥ ८॥
ज्ञान म्हणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
म्हणौनि शुद्ध ज्ञान सतंत । वेगळेंचि असे ॥ ९॥
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण ।
या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ १०॥
माहावाक्यउपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला ।
तेथीचा तो विचारचि केला । पाहिजे साधकें ॥ ११॥
माहावाक्य उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार ।
त्याच्या जपें, अंधकार- । न फिटे भ्रांतीचा ॥ १२॥
माहावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तुचि तत्वतां ।
त्याचा जप करितां वृथा । सीणचि होये ॥ १३॥
माहावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ।
शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तुच आहे ॥ १४॥
आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ ।
जें आदिअंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ॥ १५॥
जेथून हें सर्व ही प्रगटे । आणि सकळही जेथें आटे ।
तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ॥ १६॥
मतें आणी मतांतरें । जेथें होती निर्विकारें ।
अतिसूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ॥ १७॥
जे या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १८॥
शोधितां आपलें मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान ।
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ॥ १९॥
आपणासि वोळखों जातां । आंगीं बाणे सर्वज्ञता ।
तेणें येकदेसी वार्ता । निशेष उडे ॥ २०॥
मी कोण ऐसा हेत- । धरून, पाहातां देहातीत ।
आवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ॥ २१॥
असो पूर्वीं थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार- ।
पावले, ते साचार । ऐक आतां ॥ २२॥

व्यास वसिष्ठ माहामुनी । शुक नारद समाधानी ।
जनकादिक माहाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ २३ ॥
वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषेश्वर ।
शोनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ २४ ॥
सनकादिक मुख्यकरूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी ।
आणीक बोलतां वचनी । अगाध असती ॥ २५ ॥
सिद्ध मुनी माहानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव ।
जेणें सुखें माहादेव । डुल्लत सदा ॥ २६ ॥
जें वेदशास्त्रांचें सार । सिद्धांत धादांत विचार ।
ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांस होये ॥ २७ ॥
साधु संत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान ।
सर्वत्रांचें गुह्य ज्ञान । तें संगिजेल आतां ॥ २८ ॥
तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें ।
पंचाग्नी गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ॥ २९ ॥
सकळ साधनाचें फळ । ज्ञानाची सिगचि केवळ ।
जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ॥ ३० ॥
छपन्न भाषा तितुके ग्रंथ । आदिकरून वेदांत ।
या इतुकियांचा गहनार्थ । येकचि आहे ॥ ३१ ॥
जें नेणवे पुराणीं । जेथें सिणल्या वेदवाणी ।
तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ ३२ ॥
पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रंथीं ।
हृदई वसल्या कृपामुर्ती । सद्गुरु स्वामी ॥ ३३ ॥
आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत ।
माझा स्वामी कृपेसहित । हृदई वसे ॥ ३४ ॥
न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास ।
प्रेत्नेंविण सौरस । सद्गुरुकृपा ॥ ३५ ॥
ग्रंथ मात्र मऱ्हाष्ट । त्याहून संस्कृत श्रेष्ठ ।
त्या संस्कृतामधें पष्ट । थोर तो वेदांत ॥ ३६ ॥
त्या वेदांतापरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं ।
जेथें वेदगर्भ सर्वही । प्रगटजाला ॥ ३७ ॥
असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांताचाहि मथितार्थ । var वेदांचाहि
अतिगहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ॥ ३८ ॥
अरे गहनाचेंही गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन ।
सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥ ३९ ॥
सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत ।
सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आतां ॥ ४० ॥
जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझे समाधान । अत्यंत जालें ॥ ४१ ॥
तें हें माझें जीवीचें गुज । मी सांगैन म्हणतों तुज ।
जरी अवधान देसी मज । तरी आतां येच क्षणीं ॥ ४२ ॥
शिष्य म्लान्वदनें बोले । धरिले सदृढ पाउले ।
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ॥ ४३ ॥
अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ।
तोही सांगतों, ऐक्य- । गुरुशिष्य जेथें ॥ ४४ ॥
ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म ।
ये विषई संदेह भ्रम । धरूंचि नको ॥ ४५ ॥
नवविधा प्रकारें भजन । त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन ।
तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आतां ॥ ४६ ॥
निर्माण पंचभूतें यीयें । कल्पांतीं नासतीं येथान्वयें ।
प्रकृति पुरुष जीयें । तेही ब्रह्म होती ॥ ४७ ॥
दृश्य पदार्थ आटतां । आपणहि नुरे तत्वतां ।
ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींच आहे ॥ ४८ ॥
सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता ।
पिंड ब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥ ४९ ॥
ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे ।
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ५० ॥
मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तों दृश्य असतांच वोसरे ।
सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ५१ ॥
असो गुरूचे ठाई अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता ।
वेगळेंपणें अभक्ता । उरोंचि नको ॥ ५२ ॥
आतां हेंचि दृढीकर्ण- । व्हावया, करीं सद्गुरुभजन ।
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३ ॥
या नांव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ ५४ ॥
देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिनानें येरझारा । भोगिल्याच भोगी ॥ ५५ ॥
असो चहूं देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा ।
सकळ आबाळगोबळा । सबाह्य तूं ॥ ५६ ॥
कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन ।
दृढ घेतला देहाभिमान । म्हणौनियां ॥ ५७ ॥
शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ५८ ॥
अखंड घडे श्रवणमनन । तरीच पाविजे समाधान ।
पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ॥ ५९ ॥
शिष्या मुक्तपणें अनर्गळ । करिसीं इंद्रियें बाष्कळ ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ६० ॥
विषई वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें ।
मणी टाकितांचि लाधलें । राज्य जेवीं ॥ ६१ ॥
मणी होतां सीगटाचा । लोभ धरूनिया तयाचा ।
मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला ॥ ६२ ॥
ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ।
जया पुरुषास जें ध्यान । तयासि तेंचि प्राप्त ॥ ६३ ॥
म्हणोनि जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या ।
तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ॥ ६४ ॥
सन्यपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे ।
औषध घेतांचि सुखें । आनंद पावे ॥ ६५ ॥

तैसें अज्ञानसन्यपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें ।
ज्ञानऔषध घेतां तें । मुळींच नाहीं ॥ ६६ ॥
मिथ्या स्वप्नें वोसणाला । तो जागृतीस आणिला ।
तेणें पूर्वदशा पावला । निर्भय जे ॥ ६७ ॥
मिथ्याच परी सत्य वाटलें । तेणें गुणें दुःख जालें ।
मिथ्या आणी निरसलें । हें तों घडेना ॥ ६८ ॥
मिथ्या आहे जागृतासी । परी वेढा लाविलें निद्रिस्तांसी ।
जागा जालियां तयासी । भयेंचि नाहीं ॥ ६९ ॥
परी अविद्याझोंप येते भरें । भरे सर्वांगी काविरें ।
पूर्ण जागृती श्रवणद्वारें- । मननें करावी ॥ ७० ॥
जागृतीची वोळखण । ऐक तयाचें लक्षण ।
जो विषईं विरक्त पूर्ण । अंतरापासुनी ॥ ७१ ॥
जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें ।
तेणें साधन करावें । थोरीव सांडुनी ॥ ७२ ॥
साधन न मने जयाला । तो सिद्धपणे बद्ध जाला ।
त्याहूनि मुमुक्ष भला । ज्ञानाधिकारी ॥ ७३ ॥
तंव शिष्यें केला प्रश्न । कैसें बद्धमुमुक्षाचें लक्षण ।
साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ॥ ७४ ॥
याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिलीये समासीं ।
सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ॥ ७५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शुद्धज्ञाननिरूपणनाम
समास सहावा ॥ ६ ॥ ५.६

समास सातवा : बद्धलक्षण

॥ श्रीराम ॥

सृष्टी जे कां चराचर । जीव दाटले अपार ।
परी ते अवघे चत्वार । बोलिजेती ॥ १ ॥
ऐक तयांचें लक्षण । चत्वार ते कोण कोण ।
बद्ध मुमुक्ष साधक जाण । चौथा सिद्ध ॥ २ ॥
यां चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं ।
आतां असो हें सर्वही । विशद करूं ॥ ३ ॥
बद्ध म्हणिजे तो कोण । कैसें मुमुक्षाचें लक्षण ।
साधकसिद्धवोळखण । कैसी जाणावी ॥ ४ ॥
श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध ।
मुमुक्ष साधक आणि सिद्ध । पुढें निरोपिले ॥ ५ ॥
आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा ।
चक्षुविण दाही दिशा । सुन्याकार ॥ ६ ॥
भक्त ज्ञाते तापसी । योगी वीतरागी संन्यासी ।
पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाहीं ॥ ७ ॥
न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म ।
न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ ॥ ८ ॥
तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र ।
सन्मार्ग जो कां पवित्र । तो ही न दिसे ॥ ९ ॥
न कळे सारासार विचार । न कळे स्वधर्म आचार ।
न कळे कैसा परोपकार । दानपुण्य ॥ १० ॥
नाहीं पोटीं भूतदया । नाहीं सुचिष्मंत काया ।
नाहीं जनासि निववावया । वचन मृद ॥ ११ ॥
न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान ।
न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ॥ १२ ॥
न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक ।
न कळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ॥ १३ ॥
न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण ।
न कळे आपणासि आपण । या नांव बद्ध ॥ १४ ॥
न कळे जीवाचें जन्ममूळ । न कळे साधनाचें फळ ।
न कळे तत्वतां केवळ । या नांव बद्ध ॥ १५ ॥
न कळे कैसें तें बंधन । न कळे मुक्तीचें लक्षण ।
न कळे वस्तु विलक्षण । या नांव बद्ध ॥ १६ ॥
न कळे शास्त्रार्थ बोलिला । न कळे निजस्वार्थ आपुला ।
न कळे संकल्पें बांधला । या नांव बद्ध ॥ १७ ॥
जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ।
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ १८ ॥
दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मित्रि नाहीं ।
शांति नाहीं क्ष्मा नाहीं । या नांव बद्ध ॥ १९ ॥
जें ज्ञानविशिं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें ।
बहुसाल कुलक्षणें । या नांव बद्ध ॥ २० ॥
नाना प्रकारीचे दोष- । करितां, वाटे परम संतोष ।
बाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ॥ २१ ॥
बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद ।
बहु द्वंद बहु खेद । या नांव बद्ध ॥ २२ ॥
बहु दर्प बहु दंभ । बहु विषये बहु लोभ ।
बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ॥ २३ ॥
बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार ।
बहु पापी बहु विकार । या नांव बद्ध ॥ २४ ॥
बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा ।
बहु कुकर्माचा सांठा । या नांव बद्ध ॥ २५ ॥
बहु कापट्य वादवेवाद । बहु कुतर्क भेदाभेद ।
बहु क्रूर कृपामंद । या नांव बद्ध ॥ २६ ॥
बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिळाष ।
बहु प्रकारीचे दोष । या नांव बद्ध ॥ २७ ॥
बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट येकंकार ।
बहु आनित्य अविचार । या नांव बद्ध ॥ २८ ॥
बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी ।
तपीळ कुविद्या अनेकी । या नांव बद्ध ॥ २९ ॥
बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कळह बहु अनर्थी ।
बहु डाईक दुर्मती । या नांव बद्ध ॥ ३० ॥
बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना ।
बहु ममता बहु भावना । या नांव बद्ध ॥ ३१ ॥

बहु विकल्पी बहु विषादी । बहु मूर्ख बहु समंधी ।
बहु प्रपंची बहु उपाधी । या नांव बद्ध ॥ ३२ ॥
बहु वाचाळ बहु पाषंडी । बहु दुर्जन बहु थोतांडी ।
बहु पैशून्य बहु खोडी । या नांव बद्ध ॥ ३३ ॥
बहु अभाव बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तम ।
बहु विक्षेप बहु विराम । या नांव बद्ध ॥ ३४ ॥
बहु कृपण बहु खंदस्ती । बहु आदखणा बहु मस्ती ।
बहु असत्क्रिया व्यस्ती । या नांव बद्ध ॥ ३५ ॥
परमार्थविषईं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान ।
नेणे स्वयें समाधान । या नांव बद्ध ॥ ३६ ॥
परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजार । या नांव बद्ध ॥ ३७ ॥
सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ।
देहेबुद्धीची घातली बेडी । या नाव बद्ध ॥ ३८ ॥
हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ।
सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ ३९ ॥
नेत्रीं द्रव्य दारा पाहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्य दारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ४० ॥
काया वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण ।
द्रव्यदारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥ ४१ ॥
इंद्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ ।
द्रव्यदारेसि लावी सकळ । या नांव बद्ध ॥ ४२ ॥
द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ ।
द्रव्य दारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ॥ ४३ ॥
वेर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ ।
कथा वार्ता तेचि सकळ । या नांव बद्ध ॥ ४४ ॥
नाना चिंता नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग ।
करी परमार्थाचा त्याग । या नांव बद्ध ॥ ४५ ॥
घटिका पळ निमिष्यभरी । दुश्चीत नव्हतां अंतरीं ।
सर्वकाळ ध्यान करी । द्रव्यदाराप्रपंचाचें ॥ ४६ ॥
तीर्थ यात्रा दान पुण्य । भक्ति कथा निरूपण ।
मंत्र पूजा जप ध्यान । सर्वही द्रव्य दारा ॥ ४७ ॥
जागृति स्वप्न रात्रि दिवस । ऐसा लागला विषयेध्यास ।
नाहीं क्षणाचा अवकाश । या नांव बद्ध ॥ ४८ ॥
ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षपणीं पालटे जाण ।
ऐक तेही वोळखण । पुढिलीये समासीं ॥ ४९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बद्धलक्षणनाम
समास सातवा ॥ ७ ॥ ५.७

समास आठवा : मुमुक्षलक्षण

॥ श्रीराम ॥

संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें ।
जयाचेनि मुखावलोकनें । दोषचि लागे ॥ १ ॥
ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्ततां अबद्ध ।
तयास प्राप्त जाला खेद । काळांतरीं ॥ २ ॥
संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला ।
निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ॥ ३ ॥
जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास ।
म्हणे आतां पुरे सोस । संसारींचा ॥ ४ ॥
प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तों निर्फळ ।
आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ॥ ५ ॥
ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं आवस्ता लागली ।
म्हणे माझी वयेसा गेली । वेर्थचि आवघी ॥ ६ ॥
पूर्वी नाना दोष केले । ते अवघेचि आठवले ।
पुढें येउनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ ७ ॥
आठवे येमाची यातना । तेणें भयेचि वाटे मना ।
नाहीं पापासि गणना । म्हणौनियां ॥ ८ ॥
नाहीं पुण्याचा विचार । जाले पापाचे डोंगर ।
आतां दुस्तर हा संसार । कैसा तरों ॥ ९ ॥
आपले दोष आच्छादिले । भल्यांस गुणदोष लाविले ।
देवा म्यां वेर्थच निंदिले । संत साधु सज्जन ॥ १० ॥
निंदे ऐसे नाहीं दोष । तें मज घडले कीं विशेष ।
माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ॥ ११ ॥
नाहीं वोळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत ।
नाहीं अतित अभ्यागत । संतुष्ट केले ॥ १२ ॥
पूर्व पाप वोढवलें । मज कांहींच नाहीं घडलें ।
मन अव्हाटीं पडिलें । सर्वकाळ ॥ १३ ॥
नाहीं कष्टविलें शेरीर । नाहीं केला परोपकार ।
नाहीं रक्षिला आचार । काममदें ॥ १४ ॥
भक्तिमाता हे बुडविली । शांति विश्रांति मोडिली ।
मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धि सद्वासना ॥ १५ ॥
आतां कैसें घडे सार्थक । दोष केले निरार्थक ।
पाहों जातां विवेक । उरला नाहीं ॥ १६ ॥
कोण उपाये करावा । कैसा परलोक पावावा ।
कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ॥ १७ ॥
नाहीं सद्भाव उपजला । अवघा लोकिक संपादिला ।
दंभ वरपंगें केला । खटाटोप कर्माचा ॥ १८ ॥
कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं ।
आहा देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणें ॥ १९ ॥
पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बोले निराभिमान ।
अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्त जालों ॥ २० ॥
वित्पत्तीनें लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले ।
माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारींचे ॥ २१ ॥
सत्य तेंचि उछेदिलें । मिथ्य तेंचि प्रतिपादलें ।
ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें ॥ २२ ॥
ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला ।
तोचि मुमुक्ष बोलिला । ग्रंथांतरीं ॥ २३ ॥

पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी ।
विरक्त जाला संसारीं । या नांव मुमुक्ष ॥ २४ ॥
गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती ।
म्हणे धरूं सत्संगती । या नांव मुमुक्ष ॥ २५ ॥
आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे ।
आपणासि निंदी दुःखें । या नांव मुमुक्ष ॥ २६ ॥
म्हणे मी काये अनोपकारी । म्हणे मी काय दंभधारी ।
म्हणे मी काये अनाचारी । या नांव मुमुक्ष ॥ २७ ॥
म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ ।
म्हणे मी पापी केवळ । या नांव मुमुक्ष ॥ २८ ॥
म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहूनि हीन ।
म्हणे मी जन्मलो पाषाण । या नांव मुमुक्ष ॥ २९ ॥
म्हणे मी दुराभिमानी । म्हणे मी तपीळ जनीं ।
म्हणे मी नाना वेसनी । या नांव मुमुक्ष ॥ ३० ॥
म्हणे मी आळसी आंगचोर । म्हणे मी कपटी कातर ।
म्हणे मी मूर्ख अविचार । या नांव मुमुक्ष ॥ ३१ ॥
म्हणे मी निकामी वाचाळ । म्हणे मी पाषांडी तोंडाळ ।
म्हणे मी कुबुद्धि कुटीळ । या नांव मुमुक्ष ॥ ३२ ॥
म्हणे मी कांहींच नेणे । म्हणे मी सकळाहूनि उणें ।
आपलीं वर्णी कुलक्षणें । या नांव मुमुक्ष ॥ ३३ ॥
म्हणे मी अनाधिकारी । म्हणे मी कुश्चिळ अघोरी ।
म्हणे मी नीच नानापरी । या नांव मुमुक्ष ॥ ३४ ॥
म्हणे मी काये आपस्वार्थी । म्हणे मी काये अनर्थी ।
म्हणे मी नव्हे परमार्थी । या नांव मुमुक्ष ॥ ३५ ॥
म्हणे मी अवगुणाची रासी । म्हणे मी वेर्थ आलों जन्मासी ।
म्हणे मी भार जालों भूमीसी । या नांव मुमुक्ष ॥ ३६ ॥
आपणास निंदी सावकास । पोटीं संसाराचा त्रास ।
धरी सत्संगाचा हव्यास । या नांव मुमुक्ष ॥ ३७ ॥
नाना तीर्थे धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं ।
नाना ग्रन्थांतरें पाहिलीं । शोधूनियां ॥ ३८ ॥
तेणें नव्हे समाधान । वाटे अवघाच अनुमान ।
म्हणे रिघों संतांस शरण । या नांव मुमुक्ष ॥ ३९ ॥
देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान ।
सांडूनि, संतचरणीं अनन्य- । या नांव मुमुक्ष ॥ ४० ॥
अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी ।
मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्ष ॥ ४१ ॥
ज्याचें थोरपण लाजे । जो परमार्थाकारणें झिजे ।
संतापाई विश्वास उपजे । या नांव मुमुक्ष ॥ ४२ ॥
स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा ।
अंकित होईन सज्जनाचा । म्हणे तो मुमुक्ष ॥ ४३ ॥
ऐसा मुमुक्ष जाणिजे । संकेतचिन्हें वोळखिजे ।
पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ॥ ४४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुमुक्षलक्षणनाम

समास आठवा ॥ ८ ॥ ५.८

समास नववा : साधकनिरूपण

॥ श्रीराम ॥

मागां मुमुक्षाचें लक्षण । संकेतें केलें कथन ।
आतां परिसा सावधान । साधक तो कैसा ॥ १ ॥
अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग ।
तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २ ॥
जो संतांसि शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रन्थांतरीं ॥ ३ ॥
उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक ॥ ४ ॥
धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी ।
मननें अर्थांतर काढी । या नांव साधक ॥ ५ ॥
होतां सारासार विचार । ऐके होऊनि तत्पर ।
संदेह छेदूनि, दृढोत्तर- । आत्मज्ञान पाहे ॥ ६ ॥
नाना संदेहनिवृत्ती- । व्हावया, धरी सत्संगती ।
आत्मशास्त्रगुरुप्रचीती । ऐक्यतेसी आणी ॥ ७ ॥
देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ८ ॥
विसंचूनि दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान ।
विचारें राखे समाधान । या नांव साधक ॥ ९ ॥
तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी ।
लावी ऐक्यतेची समाधी । या नांव साधक ॥ १० ॥
आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार ।
विवेकें पावे पैलपार । या नांव साधक ॥ ११ ॥
उत्तमें साधूचीं लक्षणें । आंगिकारी निरूपणें ।
बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ॥ १२ ॥
असत्क्रिया ते सोडिली । आणी सत्क्रिया ते वाढविली ।
स्वरूपस्थिती बळावली । या नांव साधक ॥ १३ ॥
अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणाचा अभ्यास ।
स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ॥ १४ ॥
दृढ निश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे ।
सदा स्वरूपीं मिसळे । या नांव साधक ॥ १५ ॥
प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं ।
आत्मस्थितीची धारणा धरी । या नांव साधक ॥ १६ ॥
जें या जनासि चोरलें । मनास न वचे अनुमानलें ।
तेंचि जेणें दृढ केलें । या नांव साधक ॥ १७ ॥
जें बोलतांचि वाचा धरी । जें पाहातांचि अंध करी ।
तें साधी नाना परी । या नांव साधक ॥ १८ ॥
जें साधूं जाता साधवेना । जें लक्षूं जातां लक्षवेना ।
तेंचि अनुभवें आणी मना । या नांव साधक ॥ १९ ॥
जेथें मनचि मावळे । जेथे तर्कचि पांगुळे ।
तेंचि अनुभवा आणी बळें । या नांव साधक ॥ २० ॥

स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें ।
तेंचि वस्तु होये आंगें । या नांव साधक ॥ २१॥
अनुभवाचीं आंगें जाणे । योगियांचे खुणे बाणे ।
कांहींच नहोन असणें । या नांव साधक ॥ २२॥
परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढ बुद्धी । या नांव साधक ॥ २३॥
देवाभक्ताचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
साध्यचि होये तत्काळ । या नांव साधक ॥ २४॥
विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला ।
दिसतो, परी देखिला । नाहींच कोणीं ॥ २५॥
मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें ।
तुर्येसहि वोलांडिलें । या नांव साधक ॥ २६॥
पुढें उन्मनीचा सेवटीं । आपली आपण अखंड भेटी ।
अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नांव साधक ॥ २७॥
द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला ।
देहीं असोनि विदेह जाला । या नांव साधक ॥ २८॥
जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती ।
सकळ संदेहनिवृत्ती । या नांव साधक ॥ २९॥
पंचभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार ।
निर्गुणीं जयाचा निर्धार । या नांव साधक ॥ ३०॥
स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतास नाहीं आलें ।
सकळ मिथ्या निर्धारिलें । या नांव साधक ॥ ३१॥
मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण ।
स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ॥ ३२॥
निद्रा सांडूनि चेइरा जाला । तो स्वप्नभयापासून सुटला ।
माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ॥ ३३॥
ऐसि अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली ।
संसारउपाधी त्यागिली । या नांव साधक ॥ ३४॥
कामापासूनि सुटला । क्रोधापासूनि पळाला ।
मद मत्सर सांडिला । येकीकडे ॥ ३५॥
कुळाभिमानासि सांडिलें । लोकलाजेस लाजविलें ।
परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ॥ ३६॥
अविद्येपासूनि फडकला । प्रपञ्चापासूनि निष्टला ।
लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७॥
थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।
महत्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ॥ ३८॥
भेदाचा मडगा मोडिला । अहंकार सोडून पाडिला ।
पाईं धरूनि आपटिला । संदेहशत्रू ॥ ३९॥
विकल्पाचा केला वधू । थापें मारिला भवसिंधू ।
सकळ भूतांचा विरोधू । तोडूनि टाकिला ॥ ४०॥
भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ४१॥
देह समंधावरी लोटला । संकल्पावरी उठावला ।
कल्पनेचा घात केला । अकस्मात ॥ ४२॥
अपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें ।
पाषांडासि पछाडिलें । विवेकबळें ॥ ४३॥
गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला ।
अनर्थ तोही निर्दाळिला । नीतिन्यायें ॥ ४४॥
मोहासि मध्येंचि तोडिलें । दुःखासि दुःधडचि केलें ।
शोकासि खंडून सांडिलें । येकीकडे ॥ ४५॥
द्वेष केला देशधडी । अभावाची घेतली नरडी ।
धाकें उदर तडाडी । कुतर्काचे ॥ ४६॥
ज्ञानें विवेक माजला । तेणें निश्चयो बळावला ।
अवगुणांचा संव्हार केला । वैराग्यबळें ॥ ४७॥
अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें ।
लाटुन वाटा लाविलें । विचारें अविचारासी ॥ ४८॥
तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडूनि सांडिला ।
विषाद अविषादें घातला । पायांतळीं ॥ ४९॥
कोपावरी घालणें घातलें । कापट्य अन्तरीं कुटिलें ।
सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ॥ ५०॥
प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदांचा सोडिला संग ।
निवृत्तिपंथें ज्ञानयोग । साधिता जाहला ॥ ५१॥
विषयमैंदासि सिंतरिलें । कुविद्येसी वेढा लाविलें ।
आपणास सोडविलें । आप्ततस्करांपासूनी ॥ ५२॥
पराधीनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला ।
दुराशेचा त्याग केला । येकायेकीं ॥ ५३॥
स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना ।
साक्षेप आणि प्रेत्ना । प्रतिष्ठिलें ॥ ५४॥
अभ्यासाचा संग धरिला । साक्षपासरिसा निघाला ।
प्रेत्न सांगातीं घेतला । साधनपंथें ॥ ५५॥
सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक ।
संग त्यागूनि येक । सत्संग धरी ॥ ५६॥
बळेंचि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार ।
शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ॥ ५७॥
विसरास विसरला । आळसाचा आळस केला ।
सावध नाहीं दुश्चित्त जाला । दुश्चित्तपणासी ॥ ५८॥
आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें ।
तो साधक ऐसा येणें- । प्रमाणें बुझावा ॥ ५९॥
बळेंचि अवघा त्याग कीजे । म्हणोनि साधक बोलिजे ।
आतां सिद्ध तोचि जाणिजे । पुढिले समासीं ॥ ६०॥
येथें संशयो उठिला । निस्पृह तोचि साधक जाहला ।
त्याग न घडे संसारिकाला । तरि तो साधक नव्हे कीं ॥ ६१॥
ऐसें श्रोतयाचें उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर ।
पुढिले समासीं तत्पर । होऊनि ऐका ॥ ६२॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
साधकलक्षणनिरूपणनाम समास नववा ॥ ९॥ ५.९

समास दहावा : सिद्धलक्षण निरूपण

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला संसारिक । त्यागेंविण नव्हे कीं साधक ।
ऐका हो याचा विवेक । ऐसा असे ॥ १ ॥
सन्मार्ग तोचि जीवीं धरणें । सन्मार्गाचा त्याग करणें ।
संसारिका त्याग येणें । प्रकारें ऐसा ॥ २ ॥
कुबुद्धित्यागेंविण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं ।
संसारिकां त्याग पाहीं । ऐसा असे ॥ ३ ॥
प्रपंचीं वीट मानिला । मनें विषयेत्याग केला ।
तरीच पुढें अवलंबिला । परमार्थमार्ग ॥ ४ ॥
त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा ।
त्याग घडे अज्ञानाचा । शनै शनै ॥ ५ ॥
ऐसा सूक्ष्म अंतर्त्याग । उभयतांस घडे सांग ।
निस्पृहास बाह्य त्याग । विशेष आहे ॥ ६ ॥
संसारिका ठाई ठाई । बाह्य त्याग घडे कांहीं ।
नित्य नेम श्रवण नाहीं । त्यागेंविण ॥ ७ ॥
फिटली आशंका स्वभावें । त्यागेंविण साधक नव्हे ।
पुढें कथेचा अन्वय । सावध ऐका ॥ ८ ॥
मागां जालें निरूपण । साधकाची वोळखण ।
आतां सांगिजेल खूण । सिद्धलक्षणाची ॥ ९ ॥
साधु वस्तु होऊनि ठेला । संशयें ब्रह्मांडाबाहेरी गेला ।
निश्चयें चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध ॥ १० ॥
बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षुपणीं नाहीं जाण ।
मुमुक्षुपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ॥ ११ ॥
साधकासि संदेहवृत्ति । पुढें होतसे निवृत्ती ।
या कारणें निःसंदेह श्रोतीं । साधु वोळखावा ॥ १२ ॥
संशयरहित ज्ञान । तेंचि साधूचें लक्षण ।
सिद्धाआंगीं संशयो हीन । लागेल कैसा ॥ १३ ॥
कर्ममार्ग संशयें भरला । साधनीं संशय कालवला ।
सर्वांमध्यें संशयो भरला । साधु तो निःसंदेह ॥ १४ ॥
संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें ।
संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होये ॥ १५ ॥
व्यर्थ संशयाचा देव । व्यर्थ संशयाचा भाव ।
व्यर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांही ॥ १६ ॥
व्यर्थ संशयाचें व्रत । व्यर्थ संशयाचें तीर्थ ।
व्यर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंवीण ॥ १७ ॥
व्यर्थ संशयाची भक्ती । व्यर्थ संशयाची प्रीती ।
व्यर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ॥ १८ ॥
व्यर्थ संशयाचें जिणें । व्यर्थ संशयाचें धरणें ।
व्यर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ॥ १९ ॥
व्यर्थ संशयाची पोथी । व्यर्थ संशयाची व्युत्पत्ती ।
व्यर्थ संशयाची गती । निश्चयेंविण ॥ २० ॥
व्यर्थ संशयाचा दक्ष । व्यर्थ संशयाचा पक्ष ।
व्यर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ॥ २१ ॥
व्यर्थ संशयाचा संत । व्यर्थ संशयाचा पंडित ।
व्यर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ॥ २२ ॥
व्यर्थ संशयाची श्रेष्ठता । व्यर्थ संशयाची व्युत्पन्नता ।
व्यर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेंविण ॥ २३ ॥
निश्चयेंविण सर्व कांहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं ।
व्यर्थचि पडिले प्रवाहीं । संदेहाचे ॥ २४ ॥
निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें ।
बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक ॥ २५ ॥
असो निश्चयेंविण जे वल्गाना । ते अवघीच विटंबना ।
संशयें काहीं समाधाना । उरी नाहीं ॥ २६ ॥
म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।
तेंचि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसीं ॥ २७ ॥
तंव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण ।
मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरूपावें ॥ २८ ॥
ऐक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा ।
नाना देवांचा वळसा । करूंचि नये ॥ २९ ॥
जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार ।
शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ॥ ३० ॥
मुख्य देव तो कोण । भक्तांचें कैसें लक्षण ।
असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ॥ ३१ ॥
आपुल्या देवास वोळखावें । मग मी कोण हें पहावें ।
संग त्यागून रहावें । वस्तुरूप ॥ ३२ ॥
तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो ।
पहावा भूतांचा अन्वयो । वितिरेकेंसीं ॥ ३३ ॥
पूर्वपक्षें सिद्धांत । पहावा प्रकृतीचा अंत ।
मग पावावा निवांत । निश्चयो देवाचा ॥ ३४ ॥
देहाचेनि योगें संशयो । करी समाधानाचा क्षयो ।
चळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ॥ ३५ ॥
सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान ।
याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ॥ ३६ ॥
आठवतां देहबुद्धी । उडे विवेकाची शुद्धी ।
याकारणें आत्मबुद्धी । सदृढ करावी ॥ ३७ ॥
आत्मबुद्धी निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।
अहमात्मा हें कधींची । विसरों नये ॥ ३८ ॥
निरोपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें न कळे सत्संगेंविण ।
संतांसी गेलिया शरण । संशये तुटती ॥ ३९ ॥
आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धाचीं लक्षणें ।
मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ॥ ४० ॥
सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैंचा हो संदेहो ।
याकारणें सिद्ध पाहो । निःसंदेही ॥ ४१ ॥
देहसमंधाचेनि गुणें । लक्षणासि काये उणें ।
देहातीतांचीं लक्षणें । काय म्हणोनि सांगावीं ॥ ४२ ॥

जें लक्षवेना चक्षूंसी । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं ।
निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैंसीं ॥ ४३॥
लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठाईंची निर्गुण ।
तेंचि सिद्धांचें लक्षण । वस्तुरूप ॥ ४४॥
तथापि ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणोनि वक्तृत्व आटोपिलें ।
न्यून पूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ४५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सिद्धलक्षणनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ ५.१०
॥ दशक पांचवा समाप्त ॥

NA
Proofread by Vishwas Bhide and Sunder Hattangadi.
Reproofread by P. D. Kulkarni